MHND100000792026

**(निशाणी १ वरील आदेश )**

(दिनांक ०७ माहे एप्रिल, सन २०२६ रोजी पारीत)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम viii नियम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केला.

२.	अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ-बहिण असून अर्जदार क्र.४ ही त्यांची भावजय आहे. अर्जदार क्र.५ हा अर्जदार क्र.१ ते ३ यांचा मयत भावाचा मुलगा आहे. अर्जदार क्र.४ चे पती व अर्जदार क्र.५ चे वडील महमद मगदुम पि. अब्दुल रजाक हे दिनांक २५.०५.२०१६ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई, अर्जदार क्र.४ ची सासू व अर्जदार क्र.५ ची आजी अमिना बेगम भ्र. अब्दुल रजाक ह्या दिनांक ०८.०९.२०१९ रोजी मयत झाले आहेत. तसेच, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील, अर्जदार क्र.४ चे सासरे व अर्जदार क्र.५ चे आजोबा अब्दुल रजाक हुसेनसाब हे दिनांक १९.१०.१९९८रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांव्यतिरिक्त मयत अमिना बेगम भ्र. अब्दुल रजाक यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मे. कोर्टात सादर केलेला आहे.

३.	बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम २ नुसार वारस प्रमाणपत्र देतांना अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. सदर बॉम्बे रेग्युलेशन ऐक्टचे वाचन केल्यानंतर मी निष्कर्षास आलो आहे की, सदर नियमाअंतर्गत वारस प्रमाणपत्र देणे म्हणजे वारस, इच्छापत्र व व्यवस्थापक इत्यादींना औपचारिक मान्यता देणे होय.

४.	अर्जदारांनी त्यांच्या कथनाचे समर्थनार्थ मयत अमिना बेगम भ्र. अब्दुल रजाक यांचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी

१२), मयत अब्दुल रजाक हुसेनसाब यांचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी १३), मयत महमद मगदुम अब्दुल रजाक यांचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी १४), वारसा प्रमाणपत्र (निशाणी १५), अर्जदार क्र.१ ते ५ यांचे पडताळणी केलेले आधारकार्डच्या प्रती (निशाणी १६ ते २०) व दि.११.०२.२०२६ रोजीचे 'श्रमिक एकजूट' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहीर नोटीसची मुळ प्रत (निशाणी २१) इत्यादी अभिलेखावर दाखल केलेले आहे.

५. अर्जदार क्र.३ अब्दुल चांदपाशा पि. अब्दुल रजाक यांनी त्यांचा पुरावा शपथपत्र (निशाणी ११) अभिलेखावर दाखल केले असून सदरचा पुरावा अबाधित आहे. सदर प्रकरणामध्ये 'श्रमिक एकजूट' या स्थानिक परिसरात प्रकाशीत होणा-या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रगटन (निशाणी २१) प्रकाशित करण्यात आले आणि पर्याप्त काळासाठी आक्षेपांची वाट पाहिली, परंतु कोणताही आक्षेप आला नाही. सबब, अर्जदार क्र.१ ते ३ हे मुले या नात्याने व अर्जदार क्र.५ हा मयत अपत्याचा मुलगा या नात्याने मयत अमिना बेगम भ्र. अब्दुल रजाक यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार क्रमांक १. महमद सुलतान पि. अब्दुल रजाक, २. हाजी बेगम भ्र. मोहम्मद मोईनमियाँ, ३. अब्दुल चांदपाशा पि. अब्दुल रजाक व अर्जदार क्र.५ अब्दुल मन्नान पि. महमद मगदुम शेख हे मयत अमिना बेगम भ्र. अब्दुल रजाक यांचे वारस आहेत. |
| ३. | अर्जदारांनी आवश्यक न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे. |

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.04.07 16:45:05 +0530

(के. एस. खंडारे)
सह दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर), कंधार

दि.०७.०४.२०२६

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D.F file order are same word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | :- Mrs J P Ghogare |
| Court Name | :- In the Court of Jt.C.J.J.D., Kandhar |
| Date | :- 07.04.2026 |
| Order/Judgment signed by the Presiding officer on | :- 07.04.2026 |
| Order uploaded on | :- 07.04.2026 |